RNI NO. MAHMAR/2020/84035




BAHUJAN SAURABHA

# बहुजन सौरभ

उपलब्ध आहे!

मिस्त्री, टाइल्स फिटर, पेंटर, कारपेंटर, प्लंबर इत्यादीसाठी खालील नंबर वर संपर्क करावा.



संपर्क मो. 8482839451

रविवार, ०८ जून २०२५ | वर्ष : ५ | अंक : १६१ | दैनिक | किंमत : ₹ ५/-

Sunday, 08 June 2025 | Year : 5 | Issue : 161 | Daily | Rate: Rs. 5/-

## प्रधानमंत्र्यांनी जी-7 शिखर परिषदेला अनुपस्थित राहणे मोठी राजनैतिक चूक : काँग्रेस



**नवी दिल्ली :** कॅनडामध्ये होत असलेल्या जी-7 शिखर परिषद आयोजित केली जात आहे. मात्र या परिषदेला पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची उपस्थिती नसणार आहे. यावरून काँग्रेसने प्रधानमंत्र्यांवर टीका केली. सरकार या गोष्टीला काही काहीही वळण दिले तरी ही आणखी एक मोठी राजनैतिक चूक आहे, आधीच भारत सरकारने अमेरिकेला भारत-पाकिस्तानमध्ये मध्यस्थी करण्याची परवानगी देऊन आणि अमेरिकन अधिकाऱ्यांना तटस्थ ठिकाणी चर्चा सुरू ठेवण्यासाठी उघडपणे आवाहन करण्याची परवानगी देऊन अनेक दशकांच्या परराष्ट्र धोरणाला प्रभावित केले आहे, अशी टीका काँग्रेसने केली आहे. काँग्रेसचे माध्यम सरचिटणीस जयराम रमेश एक्सवर म्हणाले की, 15 जून 2025 पासून कॅनडातील अल्बर्टा प्रांतातील कनानास्किस येथे जी-7 शिखर परिषद आयोजित केली जात आहे. या शिखर परिषदेला अमेरिका आणि फ्रान्सचे अध्यक्ष, ब्रिटन, जपान, इटली आणि कॅनडाचे प्रधानमंत्री आणि जर्मनीचे चान्सलर उपस्थित राहणार आहेत. यावेळी ब्राझील, मेक्सिको, दक्षिण आफ्रिका आणि युक्रेनचे अध्यक्ष आणि ऑस्ट्रेलियाचे प्रधानमंत्री यांनाही आमंत्रित करण्यात आले आहे. भारताच्या प्रधानमंत्र्यांना या परिषदेमध्ये आमंत्रित करण्याची परंपरा 2014 नंतरही कायम होती. मात्र गेल्या 6 वर्षांत प्रथमच भारताचे प्रधानमंत्री या शिखर परिषदेत उपस्थित राहणार नाहीत. ही आणखी एक मोठी राजनैतिक चूक असल्याचे रमेश म्हणाले.

### भारत-कॅनडा तणावाचा परिणाम ?

जून महिन्याच्या अखेरीस कॅनडामध्ये होणाऱ्या जी-7 शिखर परिषदेला प्रधानमंत्री नरेंद्र मोदी उपस्थित राहण्याची शक्यता कमी असल्याचे म्हटले जात आहे. सहा वर्षांनंतर अशा हाय-प्रोफाईल व्यासपीठावर त्यांची ही पहिलीच अनुपस्थिती असल्याचे म्हटले जात आहे. भारत आणि कॅनडा यांच्यातील तणावपूर्ण संबंध, तसेच सुरक्षेची चिंता आणि भारताला अद्यापपर्यंत अधिकृत निमंत्रण न आल्याचे कारण या मागे सांगितले जात आहे. कॅनडात यावर्षी 15 ते 17 जून दरम्यान जी-7 शिखर परिषदेचे आयोजन होत आहे. या समिटमध्ये युरोपियन युनियन, IMF, जागतिक बँक आणि संयुक्त राष्ट्रांसह अमेरिका, ब्रिटन, जर्मनी, फ्रान्स, इटली, जपान आणि कॅनडा या प्रमुख देशांचा सहभाग आहे. दक्षिण आफ्रिका, युक्रेन आणि ऑस्ट्रेलिया सारख्या देशांनीही या समिटमध्ये सहभाग घेणार असल्याचे म्हटले आहे. जून महिन्याच्या अखेर होणाऱ्या जी-7 शिखर संमेलनाचे भारताला अद्यापपर्यंत आमंत्रण मिळालेले नसल्याचे म्हटले जात आहे. या संदर्भात अधिकृत माहीती आलेली नसली तरी खलिस्तानी दहशतवादी हरदीप सिंह निज्जर यांची हत्या झाल्यानंतर भारत-कॅनडाचे संबंध बिघडलेले असून ही पार्श्वभूमी यामागे असल्याचे म्हटले जात आहे. जी-7 शिखर परिषदेत भारताच्या उपस्थितीबाबत अद्यापही शंका घेतली जात आहे. भारताला जी-7 शिखर परिषदेसाठी कोणतेही औपचारिक निमंत्रण मिळालेले नसल्याचे म्हटले जात आहे. आणि जरी निमंत्रण मिळाले तरी, 'भारत या संमेलनास उपस्थित राहण्यास इच्छुक नाही, असेही सूत्रांनी म्हटले आहे. खलिस्तानी फुटीरतावादी हरदीप सिंग निज्जर याच्या हत्येमुळे संबंधांवर परिणाम झाल्याचेही त्यांनी मान्य केले आहे असे परराष्ट्र मंत्री अंकिता आनंद यांनी एका वृत्तसंस्थेशी बोलताना म्हटले आहे.'

## बंगळुरू चेंगराचेंगरीच्या घटनेवर उच्च न्यायालयाचे सरकारला 9 प्रश्न



**बंगळुरू :** रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू संघाने आयपीएलची ट्रॉफी जिंकल्यानंतर बंगळुरू या ठिकाणी विजय परेड काढण्यात येत असताना अचानक एम चिन्नास्वामी स्टेडियमजवळ चेंगराचेंगरीची घटना घडली होती. या घटनेत 11 जणांचा मृत्यू झाला तर अनेक जण जखमी झाले होते. त्यानंतर या प्रकरणात कर्नाटक सरकारने कारावाईचे आदेश दिल्यानंतर पोलिसांनी गुन्हा दाखल करत रायल चॅलेंज बंगळूरू (आरसीबी) आणि कार्यक्रम व्यवस्थापन (इव्हेंट मॅनेजमेंट) संस्थेच्या अधिकाऱ्यांसह 4 जणांना अटक केलं. तसेच या संपूर्ण प्रकरणाची कर्नाटक उच्च न्यायालयाने देखील गंभीर दखल घेतली होती. आता या चेंगराचेंगरीच्या घटनेबाबत कर्नाटक उच्च न्यायालयाने राज्यातील काँग्रेस सरकारला 9 प्रश्न विचारले आहेत. तसेच या प्रश्नांची उत्तरे 10 जूनपर्यंत देण्याचे निर्देश दिले आहेत. उच्च न्यायालयाने विचारलेल्या प्रश्नांमध्ये विजयोत्सव कोणी आयोजित करण्याचा निर्णय घेतला होता? तसेच हा कार्यक्रम आयोजित करण्यासाठी परवानगी घेतली होती का? अशा प्रकारच्या कोणत्याही क्रीडा स्पर्धा आणि उत्सवात 50,000 आणि त्याहून अधिक गर्दीचे व्यवस्थापन करण्यासाठी काही एसओपी तयार करण्यात आली आहे का? असे सवाल उच्च न्यायालयाने विचारले आहेत.

## रशियाचा युक्रेनवर पुन्हा तुफान हल्ला



**नवी दिल्ली :** रशिया आणि युक्रेन दरम्यान सुरु असलेले युद्ध तिसऱ्या महायुद्धाच्या उंबरठ्यावर पोहचण्याची शक्यता आहे. युक्रेनने रशियावर केलेल्या हल्ल्याचा बदला व्लादीमीर पुतिन यांनी शुक्रवारी घेतला. त्यानंतर शनिवारीसुद्धा युक्रेनवर तुफान हल्ले रशियाने केले. यामध्ये 400 पेक्षा जास्त ड्रोनने हल्ले करण्यात आले. त्यामुळे युक्रेनच्या अवकाशात अनेक स्फोट होताना दिसत होते. तसेच क्षेपणास्त्रानेसुद्धा हल्ले करण्यात आले. या हल्ल्यात सहा जणांचा मृत्यू झाला असून 80 पेक्षा जास्त जण जखमी झाले आहे. रशियाच्या चार एअरबेसवर युक्रेनने हल्ला करत 41 लढाऊ विमाने नष्ट केली होती. त्याचवेळी पुतिन यांनी युक्रेनवर जोरदार हल्ल्याचा निर्णय घेतला होता. युक्रेनच्या या हल्ल्यात युरोपचा सहभाग असल्याचा संशय व्यक्त केला जात आहे. त्यामुळे रशिया आणि युक्रेन युद्ध तिसऱ्या महायुद्धाच्या दिशेने वाटचाल करण्याची भीती व्यक्त केली जात आहे.

## नाशिकच्या आमदारांना अस्थिर ठेवण्यातच भाजपला स्वारस्य




**नाशिक :** शिवसेनेतून (उध्दव ठाकरे) हकालपट्टी झालेले बहुचर्चित सुधाकर बडगुजर आणि विधानसभा निवडणुकीत बंडखोरी करणारे माजी स्थायी सभापती गणेश गिते यांना भाजपमध्ये प्रवेश देण्याच्या हालचालींमागे भाजपच्या स्थानिक आमदारांना अस्थिर करुन त्यांना आपल्याच मतदारसंघात गुरफटून ठेवण्याची खेळी खेळली जात असल्याची भावना पक्षात प्रबळ होत आहे. विधानसभा निवडणुकीत हॅटट्रिक साधूनही जिल्ह्यातील भाजपचा एकही आमदार मंत्री होऊ शकलेला नाही. त्यांचे पंख छाटून स्थानिक नेतृत्व प्रस्थापित होणार नाही, जिल्ह्याचे नेतृत्व करू शकणार नाही, जेणेकरून बाहेरील प्रभावशाली नेता नाशिकची संपूर्ण धुरा सांभाळेल, असे पक्षांतर्गत राजकारण होत असल्याचा काही जुन्या जाणत्या कार्यकर्त्यांचा दावा आहे.

## महाराष्ट्रात विधानसभेची 'मॅच' कुणी 'फिक्स' केली : राहुल गांधीं



**नवी दिल्ली :** महाराष्ट्रात झालेल्या निवडणुकीच्या प्रक्रियेविषयी मी 3 फेब्रुवारीला संसदेत दिलेल्या भाषणात आणि त्यानंतर पत्रकार परिषदेत चिंता व्यक्त केली होती. देशात झालेल्या निवडणुकांविषयी मी त्याआधीही संशय घेतलेला आहे. प्रत्येक निवडणुकीत प्रत्येक ठिकाणी गडबडी होतात असे मी म्हणत नाही; परंतु जे घडले आहे त्याच्याकडे दुर्लक्ष करता येणार नाही. मी छोट्या-मोठ्या गोंधळाबद्दल बोलत नाही, तर आपल्या राष्ट्रीय स्तरावरील संस्थांवर ताबा मिळवून केल्या जाणाऱ्या गैरप्रकारांबद्दल बोलत आहे. पूर्वी निवडणुकांमध्ये काही विचित्र गोष्टी होत असत; परंतु 2024 च्या महाराष्ट्र विधानसभेची निवडणूक पूर्णपणे विचित्र आणि अनाकलनीय होती. या निवडणुकीत इतके गैरप्रकार झाले की, सर्व काही लपवण्याचे आटोकाट प्रयत्न करूनही काही गैरप्रकारांचे पुरावे समोर आलेच. अनधिकृत माहिती बाजूला ठेवली तरीही केवळ अधिकृत अशा आकडेवारीवरूनही सगळा खेळ समोर येतो. 'मॅच फिक्सिंग' झालेली निवडणूक लोकशाहीसाठी विषसमान आहे. महाराष्ट्रातल्या विधानसभा निवडणुकीतल्या गोंधळ-गडबडीचे सूर्यप्रकाशाइतके स्वच्छ पुरावे दोन आरोपींकडे बोट दाखवतात : निवडणूक आयोग आणि भाजप!, असे काँग्रेस खासदार आणि लोकसभेचे विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी म्हटले आहे. राहुल गांधी काही वृत्तपत्रांमध्ये प्रदीर्घ लेख लिहीत महाराष्ट्रातील निवडणूक प्रक्रियेवरच बोट ठेवले. यानंतर राजकीय वर्तुळातून प्रतिक्रिया उमटत असून, राहुल गांधी यांच्या दावे, आरोपांवर भाजपा नेते प्रत्युत्तर देताना काँग्रेसवर पलटवार करत आहेत. पत्रकारांशी संवाद साधत असलेल्या देवेंद्र फडणवीस यांना राहुल गांधी यांच्या या लेखाबाबत प्रतिक्रिया विचारण्यात आली. यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स्पष्ट शब्दांत भाष्य करताना राहुल गांधी यांच्यावर टीका केली आहे. जोपर्यंत राहुल गांधी सत्य स्वीकारणार नाहीत, जोपर्यंत ते जागे होऊन जमिनीवर काम करणार नाहीत, तोपर्यंत त्यांच्या पक्षाला कुठलेही भवितव्य उरलेले नाही. मला वाटते की, स्वतःशी खोटे बोलून, स्वतःला दिलासा देण्याचे काम राहुल गांधी करत आहेत. महाराष्ट्राच्या जनतेचा, आमच्या लाडक्या बहिणींचा अपमान राहुल गांधी करत आहेत. त्यांनी जागे झाले पाहिजे, असा सल्ला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी म्हटले आहे.

## केरळमधील ट्रॅव्हल व्लॉगरचा महिलांना 'सिंदूर' वर टिका



**तिरुअनंतपुरम :** केरळमधील तिरुअनंतपुरम येथील एक ट्रॅव्हल व्लॉगर महीन शाजहान याच्यावर सध्या चांगलीच टीका केली जात आहे. या व्लॉगरने स्वतःचा परदेशी नागरिकांबरोबर एका हिंदू मंदिरात जाऊन त्यांच्या कपाळावर सिंदूर लावतानाचा व्हिडिओ पोस्ट केला होता. त्यानंतर त्याला सोशल मीडियावर नागरिकांच्या रोषाला सामोरे जावे लागत आहेत. अनेकांनी ही कृती अयोग्य आणि हिंदू परंपरांचा अपमान करणारी असल्याचे म्हटले आहे.

शाजहान याने हा व्हिडीओ त्याच्या इंस्टाग्राम अकाउंटवर (@hitchhiking.nomad) 25 मे रोजी पोस्ट केला. या व्हिडीओमध्ये तो त्याच्या मित्रांबरोबर मंदिरात प्रवेश करताना आणि त्याच्या मित्राचे स्वागत कपाळावर 'सिंदूर' लावून करताना दिसत आहे.

## नागपूर - मुंबई समृद्धी महामार्गावरील वाहनांच्या संख्येत वाढ

**मुंबई :** नागपूर - मुंबई समृद्धी महामार्गावरील इगतपुरी - आमणे हा शेवटचा टप्पा गुरुवारी सायंकाळी वाहतूक सेवेत दाखल झाला. हा टप्पा वाहतूक सेवेत दाखल झाल्याने संपूर्ण समृद्धी महामार्ग वाहतुकीसाठी खुला झाला आहे. त्यामुळे आता समृद्धी महामार्गावरील वाहनांच्या संख्येत वाढ होण्यास सुरुवात झाली आहे. पहिल्या दिवशी, 24 तासांत या महामार्गावरून तब्बल 38 हजार 987 वाहनांनी प्रवास केला. यापैकी 5 हजार वाहने नव्याने वाहतुकीसाठी खुल्या झालेल्या इगतपुरी - आमणे टप्प्यावरून धावली.



दैनिक बहुजन सौरभ चे कार्यकारी संपादक विलास गजभिये यांचा वाढदिवस कार्यालयात साजरा करण्यात आला याप्रसंगी प्रामुख्याने उपस्थित भन्ते नागदीपांकर महास्थविर, नरहरि मोटघरे, संथागार फाऊडेशन चे एम एस जांभुळे, आविष्कार संगीता अकादमीचे अनिल भगत, व टीम तसेच निवासी संपादन संध्या राजूरकर व बहुजन सौरभ टीम.

## वरिष्ठ विद्यार्थ्यांच्या रॅगिंगला कंटाळून एमबीबीएस विद्यार्थ्याने केली आत्महत्या



**जबलपूर :** जबलपूर येथील नेताजी सुभाषचंद्र बोस मेडिकल कॉलेजमध्ये एमबीबीएसच्या पहिल्या वर्षाच्या विद्यार्थ्या शिवांश गुप्ताच्या दुःखद आत्महत्येने अनेक प्रश्न उपस्थित केले आहेत. शिवांशने नुकतीच एक नवीन बाईक खरेदी केली होती, जी त्याच्या काही वरिष्ठ विद्यार्थ्यांना आवडली नव्हती. कुटुंबाचा आरोप आहे की या कारणामुळे त्याला रॅगिंग करण्यात आले होते आणि मानसिक त्रास देण्यात आला होता की त्याने वसतिगृहाच्या छतावरून उडी मारून आत्महत्या केली. या घटनेमुळे वैद्यकीय संस्थांमध्ये रॅगिंगच्या वाढत्या घटनांबद्दल चिंता निर्माण झाली आहे. मूळचा रेवा येथील रहिवासी असलेला आणि जबलपूर येथील नेताजी सुभाषचंद्र बोस मेडिकल कॉलेजमध्ये एमबीबीएसच्या पहिल्या वर्षाचा विद्यार्थी असलेल्या शिवांश गुप्ताने वसतिगृहाच्या छतावरून उडी मारून आत्महत्या केली. कुटुंबाचा आरोप आहे की शिवांशने नुकतीच नवीन बाईक खरेदी केल्यानंतर त्याला रॅगिंग केले जात होते आणि वरिष्ठ विद्यार्थ्यांनी त्याला सतत त्रास देण्यास सुरुवात केली होती. शिवांशने त्याच्या आईशी फोनवर बोलताना रॅगिंगबद्दल बोलले होते. त्याच्या आईने सांगितले की मुलाच्या आवाजात भीती आणि ताण स्पष्ट दिसत होता. शिवांशचे काका दिनेश गुप्ता म्हणाले की, काही वरिष्ठ विद्यार्थ्यांनी त्याला बाईक खरेदी केल्याबद्दल तीन तास ताब्यात ठेवले आणि मारहाणही केली. या ताण आणि मानसिक दबावामुळे तो दोन दिवसांपासून नैराश्यात होता. घटनेपूर्वी शिवांशने त्याच्या मित्रांना आणि वडिलांना मेसेज केला होता. बुधवारी रात्री ही घटना घडली, जेव्हा शिवांशने काही मित्रांशी या विषयावर चर्चा केली आणि नंतर गुरुवारी दुपारी वसतिगृहाच्या चौथ्या मजल्यावरून उडी मारली. घटनेच्या काही काळपूर्वी त्याने त्याच्या मित्रांना आणि वडिलांना आभार मानण्याचा संदेश पाठवला होता. या घटनेनंतर पोलिसांनी तपास सुरू केला आहे आणि शिवांशने ज्या विद्यार्थ्यांशी शेवटचे बोलले होते त्यांचा मोबाईल डेटा शोधला जात आहे. कॉलेज प्रशासनाने अँटी रॅगिंग समितीची बैठक बोलावून चौकशी सुरू केली आहे.

## मदतनिस पाहिजे

सुगतनगर, इंदोरा परिसरातील रहिवासी असणारा एक पदविधर मदतनिस पाहिजे.

पगार ९०००/- रूपये महिना

संपर्क
मो. 7507661569



ॲड. सुरेश घाटे

बुद्धा जवान पँथर

जन्म दि. ८ जून १९४६

## वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा!

80व्या वर्षात पदार्पण

सुख, आनंदाची वैभवी उगवावी पहाट
फुलावी आयुष्यातील स्वप्नांची वाट
संकल्पाना मिळावी नवी दिशा
पूर्ण व्हाव्या मनातील सर्व आशा
हिऱ्यासारखे चमकावे तुमचे कर्तृत्व हीच सदिच्छा




: शुभेच्छूक :

मानसी घाटे, रत्नमाला वडूलवार, धम्मचारी प्रकाश बौद्ध, राजेश पाटील, ओजस व सर्व मित्र परिवार समता सैनिक दल (पँथर), भिमकुटी, नागपूर.

## वाचकांना आवाहन

दैनिक बहुजन सौरभची नागपूर शहरात सतत मागणी वाढत आहे. आपल्या घरी जो पेपर देतो. त्यांच्याकडे दैनिक बहुजन सौरभची मागणी करावी. आमच्या वर्तमानपत्राची स्वतंत्र अशी कोणतीही वितरण व्यवस्था नाही.



बहुजन सौरभ

दैनिक बहुजन सौरभ नागपूर शहरात सर्वच पेपर विक्री केंद्रावरती उपलब्ध आहे. याची वाचकांनी नोंद घ्यावी.

मुख्य संपादक
दैनिक बहुजन सौरभ

"विचार करा, प्रारंभ करा, आणि आत्मविश्वासाने पुर्ण करा..."


बहुजन सौरभ
BAHUJAN SAURABHA




*14 एप्रिल 2025 महाराष्ट्रातील सर्व ग्रामपंचायती मध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीचा कार्यक्रम झाला. अभिवादनासाठी आलेल्या लोकांनी आग्रह केला. सर डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि शेतकरी यावर विचार व्यक्त करा.*

# वीस हजार शेतकऱ्यांचा मोर्चा




वर्धा जिल्ह्यातील काजळी गावात इतर मागासवर्गीय आणि आदिवासी शेतकरी, शेतमजूर, पशु पालक रहिवासी आहेत. तेथील प्रसंग आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर भारतीय घटनेचे शिल्पकार आहेत पण त्या पुर्वी ते कसे होते हे लक्षात घेतले पाहिजे. डॉ. भीमराव रामजी आंबेडकर यांना सहज बाबासाहेब ही सहज पदवी मिळाली नाही तर ते डॉ. बाबासाहेब सारखे जगले आहेत. देश विदेशाचा अभ्यास केला, उच्च शिक्षण, संपादक, लेखक, पुढारी, मंत्री झाले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणजे अखंड विचारांचे हिमालय आहेत. आपण त्यातील एक थोडक्यात कालखंडाची आठवण करू या! सन 1936 ते 1946 डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा कार्यकाळ शोषित, कष्टकरी, मजूर शेतकरी यांचे नेतृत्व करणारा होता. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या कार्याची दखल घेत 22 जानेवारी 1928 रोजी डॉ. पी. जी. सोळंकी यांच्या अध्यक्षतेखाली मुंबईत डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना मानपत्र देण्यात आले. त्यावेळी डॉ. बाबासाहेब आपल्या भाषणात म्हणाले होते की, माझा जन्म जरी महार जमातीत झाला असला तरी मी सर्वस्वी महार जमातीसाठीच प्रयत्न करीन असे नाही. उलट इतर जातीसाठी मी वाटेल ते करेन. फक्त एवढेच की, या बहुजनांतील सर्व जातीत एकता पाहिजे. बहुजनांची एकसंघता आणि त्यांची उन्नती हेच माझे ध्येय समजतो. बहुजन समाजाने एकसंघ राहून शिस्तीच्या आणि हिंमतीच्या मार्गाने आपली उन्नती करून घ्यावी. डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणजे या देशातील पीडित, कामगार, कष्टकरी, शेतकरी, या बहुजनांचे दिव्यस्वप्न होते. या देशात विषमतावाद्यांनी जातीभेदाच्या आधारे समान शारीरिक वैशिष्ट्ये असणाऱ्या माणसांचे पानवठे त्याचबरोबर मसनवटेदेखील वेगळे केले. या विभाजन प्रवृत्तीमुळे बहुजन समाजाची संघशक्ती क्षीण झाली, नव्हे संपविली. बहुजन समाजातील सामाजिक व्यवस्थेबरोबर आर्थिक समस्यांना भिडतांना डॉ. बाबासाहेबांनी जातीव्यवस्थेला केंद्रस्थानी ठेवून विचार केला. ब्राम्हणशाही आणि भांडवलशाही हे कष्टकरी, शोषितवर्गाचे कट्टर शत्रू आहेत, म्हणून त्यांच्या विरोधात कडाडून लढा दिला. जातीव्यवस्थेच्या निरनिराळ्या आर्थिक पैलूंचा अभ्यास केला. उत्पादनासंबंधी मालकी वरिष्ठ जातीच्या हातात तर शारीरिक श्रम बहुजनांच्या वाट्याला आले. या संदर्भात डॉ. बाबासाहेब आपल्या 'ॲन्हायलेशन ऑफ कास्ट' यात लिहितात या प्रक्रियेत श्रमाचे विभाजणीच नव्हे तर, श्रमिकांचीही विभागणी घडविली आहे. डॉ. बाबासाहेबांनी या देशातील विषमतेविरूद्ध, सामाजिक व्यवस्थेविरूद्ध अथक लढा देवून या बहुजन समाजाला ताठ मानेने स्वाभिमानाने जगायला शिकविले.



विलास गजभिये
मो. 9421588901

बहुजनांची भिती, दैन्य, दारिद्र्य, अंधश्रद्धा दूर करून विज्ञानवादीवृत्ती जोपासण्याचे बळ दिले. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे सामाजिक, राजकीय, विचार म्हणजे राष्ट्रनिर्माणक तत्वज्ञानचा अविष्कार आहे. सांस्कृतिक मूल्यांचा अनुबंध असलेला एक ते धगधगता प्रवाह आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे एक या देशातील समस्त शोषित, पीडित, कष्टकरी कामगाराची कल्याणकारीशक्ती आहे. या देशातील शोषित, पीडित, शेतकरी, कष्टकरी, कामगार कामगारांच्या कल्याणासाठी बाबासाहेबांनी 1936 साली 'स्वतंत्र मजूर पक्ष'ची स्थापना केली. भांडवलदारविरूद्ध मजूर, कष्टकरी, शेतकरी, कामगार यांचे ऐतिहासिक स्वरूपाचे लढे दिले. या स्वतंत्र मजूर पक्षाच्या घटनेत डॉ. बाबासाहेबांनी शेतकऱ्यांच्या शेतातील माल दलालामार्फत बाजारात पाठविण्यापेक्षा शेतकऱ्यांची एक सामूहिक सोसायटी निर्माण करून शेतकऱ्यांचा माल विकण्याचे सहकारी तत्वाचे प्रयोजन केले. याच पक्षाच्या घटनेत याच देशातील आजचा ज्वलंत प्रश्न 'पाणी' या प्रश्नांची मांडणी डॉ. बाबासाहेबांनी नदीजोड प्रकल्प दिला आहे. त्यामुळे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या दुरदृष्टीचा हा विचार किती मोठा होता यावरून दिसते. नदी जोड प्रकल्पाच्या रूपाने मांडली होती. याचा विचार आज प्रकर्षाने केला जातो आहे. परंतु या देशाची सामाजिक व्यवस्था ही केवळ आर्थिक आधारावर नसल्यामुळे व जातीव्यवस्थेवर आधारित असल्यामुळे दलितेतर मजूर, कष्टकरी, कामगार, या पक्षात सामील होण्यास उदासीन राहिला.

या दलित, शोषितांना राजकीयदृष्ट्या सक्षम करण्याची. गरज लक्षात घेऊन डॉ. बाबासाहेबांनी 1942 साली 'शेड्युल कास्ट फेडरेशनची' स्थापना केली. या पक्षाद्वारे डॉ. बाबासाहेबांनी शोषित, पीडित दलितांमध्ये राजकीय अस्मिता निर्माण केली. डॉ. बाबासाहेबांना फक्त राजकीय शक्ती निर्माण करावयाची नव्हती, तर एक आदर्श समाज निर्माण करावयाचे स्वप्न होते. 'शेड्युल कास्ट फेडरेशनच्या' वतीने डॉ. बाबासाहेबांनी बहुजन समाजाला सामावून घेवून अनेक लढे दिले. यात उल्लेखनीय बाब म्हणजे कोकणातील कुणबी समाजाचा लढा. या कुणबी समाजाने 'शेड्युल कास्ट फेडरेशनच्या' सहकार्याने आणि डॉ. बाबासाहेबांचे सहकारी चिपळूणचे भास्करराव कांबळे, रायगडचे अनंतराव चित्रे व अशा अनेक सहकाऱ्यांच्या मदतीने शेतकऱ्यांचे शोषण करणाऱ्या 'खोता' विरूद्ध लढा दिला. अनेक कार्यकर्ते यात सामील होते. या पक्षाच्या वतीने 20000 शेतकऱ्यांचा मोर्चा आझाद मैदानावरून कॉन्सिल हॉलवर नेला व खोतांच्या अत्याचाराला वाचा फोडली. परंतु हा कुणबी समाज 1936 ते 1946 पर्यंतच डॉ. बाबासाहेबांपर्यंत होता. देश स्वातंत्र्यानंतर त्यांनी डॉ. बाबासाहेबांची साथ सोडली. उपस्थित मान्यवरांना डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची माहिती नविन होती. त्यांना केवळ डॉ बाबासाहेब आंबेडकर दलितांचे कैवारी आणि भारतीय राज्य घटना शिल्पकार इतकेच माहीत होते. डॉ. बाबासाहेबांच्या संदर्भात विविध माहिती होणे ही काळाची गरज आहे. ती पण वारंवार. ■ ■

# गावगंध

सकाळी फिरून आल्यावर दारात पाऊल ठेवताच बायको म्हणाली, 'अहो, पूर्णा वहिनींचा फोन आला होता.'

'काय म्हणत होत्या?'

'कधी येताय विचारत होत्या.'

'न चुकता मे महिन्यात फोन करतात वाहिनी, नाही?'

'हो ना, तुम्ही फ्रेश व्हा, मी चहा घेऊन येते.' संवाद आटोपून बायको किचनकडे निघून गेली.

माझ्या डोळ्यासमोर मात्र एक पूर्ण पट उभा राहिला. आमची पूर्णा वाहिनी म्हणजे बबनची बायको, विचारी, कष्टिक आणि नाते सांभाळणारी. बबन शहरालगतच्या एका गावात राहत असे. बारा, पंधरा एकर शेती होती. बबनचे वडील करायचे. थोडे शिकलेले, धोरणी आणि गावात मान असलेले. त्यांना वाटायचे पोरांनी शिकावे म्हणून गावच्या शाळेत चौथीपर्यंत शिक्षण झाल्यावर त्याला पुढच्या शिक्षणासाठी शहरात आणले. आमच्याच घराशेजारी खोल्या भाड्याने घेऊन बबनला शाळेत दाखल केले. त्याच्या सोबत त्याची आजी पण होती. तेंव्हा लोक अशी बंदिस्त नसल्याने रोज संवाद व्हायचा. यातून प्रकाश, राहुल, मी, बबन समवयस्क असल्याने दोस्ताना झाला. आजीची पण आजुबाजूला ओळखी वाढली. आजी मनमिळावू असल्याने कुणीही तिच्याशी संवाद साधत असे. वेटाळात बरीच घरे होती. पण त्यापैकी आमच्या चार घरांचे एक वेगळे नाते निर्माण झाले होते.

काका प्रत्येक रविवारला चक्कर टाकत. काही लागले तर भरून देत. गावावरून येतांना कधी खाली हात येत नव्हते. त्यांनी आणलेला भाजीपाला, फळे आमच्या घरापर्यंत नियमित येत होती. काका नियमित आमचीपण चौकशी करायचे. आमच्या आईवडिलांना सांगायचे, 'यांच्याकडे लक्ष देत जा.'

काळ जात होता. बबनचे लक्ष अभ्यासात कधी लागले नाही. सातव्या, आठव्या वर्गात आल्यावर तोच शनिवारला सकाळची शाळा आटोपली की गावाकडे जायचा. शेतीत वडिलांना मदत करायचा. वडील रागावत, हा मुकाट्याने ऐकायचा. पण, शेतीत कामासाठी जायचाच. या दरम्यान त्याची लहान बहीण निर्मला शिक्षणासाठी नागपुरात होती. ती मात्र बबनच्या अगदी विरुद्ध! अभ्यासात हुशार, शिक्षणाची ओढ असलेली. आजी आणि आम्हा कुटुंबाच्या भरवश्यावर काका एकदम निर्धास्त होते. तर, बबनचे लक्ष अभ्यासात नाही हे काकांच्या लक्षात येत होते. हा विचार बबनने दहाव्या वर्गात नापास होऊन प्रत्यक्षात उतरवला होता. काका त्याला समजावत पण त्याला उमगत नव्हते. शेतीत मात्र जीवतोड मेहनत करत असे. थोडी आधुनिक शेती करण्याचाही प्रयत्न करीत होता. विशेष म्हणजे तो ज्यात हात घाले त्यात त्याला यश येत होते. चार प्रयत्नानंतर मॅट्रिक झाला. अकरावीत काकांच्या जबरदस्तीने प्रवेश घेतला. पण शेतीकडे जाणे कायम ठेवले. बाराव्या वर्गात नापास झाल्यावर मात्र त्याने ठरवले, 'बस झाले आता शिक्षण, आता फक्त शेती.'




काकांचा नाईलाज होता. त्यांनी आणखी काही शेती भाड्याने घेऊन कसायला सुरुवात केली. गाडी घेतली. आधुनिक शेती अवजार घेतली. शासकीय योजनांची माहिती घेऊन त्याचा फायदा घेतला. बबन सर्व व्याप सांभाळायचा. रविवार मात्र शहरात. येताना भाजीपाला, फळांच्या पिशव्या भरून यायचा. आम्हाला वाटून द्यायचा. बहिणीचे काही काम असले की ते आटोपून आम्हाला भटकायला न्यायचा. मजा यायची. आम्ही पण त्याच्या गावाला मधे मधे जात होतो. एक दोन दिवस राहून शेतीत मजा लुटत होतो. काका, काकू आमची खूप बडदास्त ठेवायचे. गावात मन रमत होते.



अनिरुद्ध कांबळे
मो.9922959770

आम्ही सारख्या वयाचे, आम्ही शिक्षण आणि नौकरीसाठी धडपडत होतो. आम्हाला कधी पैश्याची गरज भासली तर बबन कधी नकार देत नव्हता. हे त्याचे उपकार कधीच विसरता येणारे नव्हते. बाहेरगावला इंटरव्ह्यू असला तर सोबत यायचा. तेवढच फिरून येऊ ही त्याची भावना. तो मात्र शेतीत स्थिरावला होता. प्रगती करीत होता. बबनच आता लग्न आटोपून घ्यावे या विचारावर काका आले. त्यांनी त्या दिशेने प्रयत्न सुरू केले. पण यश येत नव्हते. शेती करणाऱ्या मुलाला मुलगी द्यायला कुणी हिंमत करीत नव्हते. एक दिवस काका नागपुरात आले. आम्हाला बोलावून म्हणाले, 'बापू, बबनचे लग्न करून द्यावे असा विचार आहे. एखादी मुलगी असली तर सांगा.'

'काका, माझ्या आत्याची मुलगी आहे. दोघीच आहेत. जास्त शिकली नाही. मामा वारल्यामुळे आत्या शेतीत मजुरी करते. ती पण मधे मधे शेतीत कामाला जाते. तुमची इच्छा असेल तर बघता येईल.' प्रकाश बोलला.

'काही हरकत नाही, तुम्ही सांगा तस करू.'

प्रकाशच्या वडिलांशी बोलून आम्ही तिघे मग आत्याच्या गावला गेलो. आत्याशी बोललो. पूर्णा ताईला माहिती दिली. आत्या दाखवायला हरकत नाही म्हणाली. आम्ही तिला सांगितले, 'हा दाखवायचा कार्यक्रम प्रकाशच्या घरी करू.' ती तयार झाली. एका रविवारला मुलगी बघण्याचा कार्यक्रम आटोपला. बबनला ती पसंत पडली. काही काळाने बोलणी पार पडली. काकांनी त्यांची स्थिती लक्षात घेऊन त्यांच्या पद्धतीने मंगल परिणय आटोपण्याला संमती दिली. त्याच्या लग्नात आम्ही गावला चार दिवस राहिलो. धमाल केली. पुढे आम्ही सर्व स्थिरस्थावर झालो. संसार उभे राहिलेत. पण बबन आणि पूर्णा वाहिनी मात्र आवर्जून हिवाळ्यात आणि उन्हाळ्यात आंबा मोसमात आम्हाला गावाकडे बोलवत असत. आम्ही योगायोग जुळला की जात असू. मजा यायची. मुले शेतीत मजा करायचे. दिवस झटपट सरकून गेले होते.

'अहो, कुठला विचार करताय, घ्या चहा. काय ठरवताय मग?'

'मी बोलतो राहुल आणि प्रकाश सोबत, जाऊ या..'

एका शनिवारला आम्ही कुटुंबासह गावी गेलो. आता सोबत मुले नव्हती. आपआपल्या मार्गाला लागली होती. बबनची मुले पण शिकून कामाला लागली होती. पूर्णा वहिनींनी त्यांच्यासाठी खूप मेहनत घेतली होती. आता आम्ही ज्येष्ठच गावाला होतो. एक - एक आठवण काढत पाहुणचार सुरू होता. विशेष म्हणजे आमच्या बायकांनी पण हे संबंध टिकवून ठेवले होते. त्यांच्यात निर्माण झालेले बॉण्डिंग आम्हाला सुखावत होते. मंगळवार उजाडला. आम्ही परतीचा प्रवास करणार होतो. रात्री मे महिन्यात कधी कधी हजेरी लावणारा अवकाळी पाऊस बरसून गेला होता. सकाळपासून पावसाची रिपरिप सुरू होती. आम्ही आमची वाहने काढली आणि रस्त्याला लागलो. ओल्या मातीच्या सुटलेल्या सुगंधातून 'पुन्हा या'असा निरोप असल्याचा भास येत होता. ■ ■

# गायिका कवितताई विद्यागर यांची संघर्षमय गीतयात्रा

अनेकांशी माझे नात्याप्रमाणे चांगले संबंध आहेत. अशा कलावंत पैकी गायिका कविताताई विद्यागर यांचा कार्यक्रम मी कविवर्य रमेशजी येलवे यांच्या मुळे प्रथम ऐकला. अत्यंत विनम्र बोलण तशीच स्वतः हार्मोनियम वाजवून बहारदार पहाडी आवाजात गायकी हजरजबाबीपणा. शांत स्वभाव, कार्यक्रम संपल्यावर कविवर्य येलवे दादांनी माझी ओळख करून दिली. हे गुरूजी, उत्तम कवी गायक लेखक आहेत. उभयतांनी माझीही आस्थेने आपुलकीने विचारपुस केली. मी ही त्यांची विचारपुस केली. ताई किती शिकलात या माझ्या प्रश्नावर त्या हसल्या. गुरूजी कसले शिक्षण फक्त अक्षर ओळख आहे. त्याआधारे मी गाते. पण कवीने दिलेल्या शब्दांत बदल करत नाही. शेरोशायरी, हिंदी मराठी, कव्वाली, लोकगीत अगदी सुस्पष्ट गायन. सोबत त्यांचा मुलगा, आणि मुलीचा मुलगा ढोलक, तबला वादन आणि पती कोरस द्यायला.




चळवळी करिता आम्ही गातोय, पती बी.एम.सी.त नोकरीला, मुलगा उच्चशिक्षित पदवीधर, त्यानेही कलेच्या छंदापाई बेस्ट मधली नोकरी सोडली आहे. वीस पंचवीस वर्षापूर्वी पतीची नोकरी आणि गायन कला जपत मुलाचे कुटुंबाच संगोपन केले. बुद्ध, फुले, बाबासाहेब, यशोधरा, सावित्रीमाई भीमाई, यांचे गुण गाण्यात, प्रबोधन करण्यात आम्हाला पैशापेक्षा मानसिक समाधान खूप मिळते, समाज आमच्या जोडीला आहे. संपूर्ण महाराष्ट्रात, आमच्या कोकणात रत्नागिरी जिल्ह्यात खेड्यापाड्यात ताईंच्या कार्यक्रमाचा रसिक वर्ग आहे. महाराष्ट्राबाहेर, मध्यप्रदेश महुगावी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जन्म ठिकाणी आपण गायनाचा कार्यक्रम सादर केला यांचाही आनंद समाधान आपल्याला आहे असे त्यांनी सांगितले. दहा बारा वर्षापूर्वी ताईचा कार्यक्रम माझ्या गावापासून दहाबारा मैलावर होता. त्या मुख्य रस्त्यावर उतरल्या. पुढे जायला गाडी नव्हती, जाणारे कसे, त्यांच्या कार्यक्रमाला वाद्यवृंद मध्ये माणिक कोकाटे यांचे बंधू होते, ते म्हणाले राष्ट्रपाल सावंत इथेच कुठेतरी जवळ राहतात. त्यांनी मला फोन केला, त्यादिवशी माझाही दुसऱ्या गावी कार्यक्रम होता. मी निघत असतांना फोन आला. मी जिथे यांचा गायन संच थांबला होता तिथे जाऊन सर्वांना माझ्या घरी आणून तासभर थांबवून गाडी बघून कार्यक्रम स्थळी पाठविले. ताईंचा मुलगा विनोद यांची आणि माझी वयात खूप अंतर असल तरी धम्म, सामाजिक, कला, साहित्य कार्यामुळे तशी मैत्री आहे. मुंबईत गायिका मैनाताई माणिक कोकाटे यांच्या कडे कधी गेल्यावर हमखास विद्यागर ताईंच्याकडे जाण होत. अतिशय आपुलकीने आदरतिथ्य या कुटुंबाकडून केले जाते. त्यांचे बंधू प्रख्यात गायक तबला वादक विठ्ठल शिलवंत यांची आणि माझीही तशी चांगली मैत्री.



राष्ट्रपाल भा. सावंत
मो. 9403144356

कविताताई यांचा घरात आई-वडिलांच्या भजनांनी मनात संगीताची पहिली पेरणी झाली. प्रथम हार्मोनियम शिकली आणि मग गाण्याच्या वाटेवर पहिले पाऊल टाकले. मोठे भाऊ भानुदास शिलवंत यांच्या सोबत भजन कार्यक्रमांतून गाण्याची संधी मिळाली. याच वाटेवर पुढे विठ्ठल शिलवंत यांच्यासोबत आंबेडकरी चळवळीचे कार्यक्रम सुरू केले. घाटकोपर, दादर, कुलाबा अशा विविध ठिकाणी रविवारी व गुरुवारी गाण्याचे कार्यक्रम होत गेले. 1988-89 मध्ये प्रबोधनकार प्रभाकर पोखरीकर यांच्यासोबत घाटकोपरच्या जागृती नगर येथे झालेला पहिला आंबेडकर जयंती कार्यक्रम त्यांच्या आयुष्यातील एक अविस्मरणीय क्षण ठरला. यानंतर त्यांचा आवाज आंतरराष्ट्रीय किर्तीचे प्रख्यात लोककलावंत, शाहीर विठ्ठलजी उमप, महान गायक प्रल्हादजी शिंदे, जनार्दन धोत्रे, चंद्रकांत शिंदे, गौतम धुमाळ, गुलाबराव जगतकार, आनंद शिंदे, मिलिंद शिंदे अशा अनेक नामवंत आंबेडकरी गायकांबरोबर होऊ लागले लागला. एवढ्या मोठ्या गायकासमोर त्यांची जुगलबंदी रंगली, सभाधिष्ट स्वभाव, योग्य मार्मिक बोलणे यातून त्यांनी समोरील कलावंत, रसिक यांची मन जिंकली आहेत. त्यांचा हा प्रेरणादायी वसा आज पुढे चालवत आहेत त्यांचे सुपुत्र, ॲडव्होकेट विनोद विद्यागर. ते केवळ आंबेडकरी गीत गायक म्हणूनच नव्हे, तर एक उच्च शिक्षित कायदेतज्ज्ञ म्हणूनही समाजात त्यांची ओळख आहे. गीतांमधून लोकांच्या हृदयात जागा निर्माण करणाऱ्या कविताताईंच्या पावलावर पाऊल ठेवून, ॲड. विनोद विद्यागर गीतांमधून आणि कायद्याच्या माध्यमातून लोकांपर्यंत भीमरावांचा विचार पोहोचवत आहेत. त्यांची ही दोन्ही रूपे गायक आणि ॲडव्होकेट एकत्र मिळून आंबेडकरी विचारांना न्यायालयाच्या दारापासून गावकुसापर्यंत पोहोचवतात. ही कहाणी आहे संघर्ष, श्रद्धा आणि सामाजिक समर्पणाची जिथे आवाजाने क्रांती घडवली आणि आज तीच क्रांती कायद्याच्या मार्गाने चालू आहे. विनोदने आईचा कला वारसा जोपासला आहे. जेमतेम अक्षर ओळख असणाऱ्या जुन्या काळातील आमच्या अनेक गायिका भगिनींनी ही चळवळ, बुद्ध फुले आंबेडकरी विचारधारा, तत्व पुढे नेण्याचे काम केले आहे. त्यातीलच एक कविताताई आहेत. कोकणात खेड्यापाड्यात डोंगर-दऱ्या, नदी नाले मधून छोट्या होडीतून खाडी ओलांडून, मैलोनमैल पायपीट करून प्रबोधन केले आहे. मंडणगड तालुक्यातील पंचवीस वर्षापूर्वीची त्यांनी एक आठवण सांगितली, नावाच्या अक्षरात साधर्मय असणाऱ्या गावात जाणारी वस्तीची एस. टी. पकडून तालुक्यातील शेवटच्या गावात त्या गेल्या, एस.टी. त्यांना सोडून पुढे गेल्यावर या गावात कार्यक्रम नसून तो गाव पंधरा मैल दूर आहे. अन्य वाहन किंवा संपर्क सुविधा नसल्याने पुन्हा संचासह डोक्यावर साहित्य घेऊन भर जंगलाच्या पायवाटेने अंधारातून चालत रात्री बारा नंतर त्या कार्यक्रम स्थळी पोहचल्या. आयोजक यांनाही त्यांचा हा प्रवास ऐकून आश्चर्य वाटले, तुम्ही सुरक्षित आलात हीच तुमची खरी पुण्याई त्यांनी उचित सन्मान पाहुणचार करून मग कार्यक्रम सुरू केला तोवर दोन अडीच पर्यंत प्रेक्षक थांबून राहिले. अशा काही आठवणी त्यांनी सांगितल्या. अशा या चळवळीतील गायिका भगिनिंचा समाजाने सन्मान करायला हवा, शासन दरबारी त्यांच्या कलेची नोंद व्हायला हवी. नव्यापिढी समोर त्यांची माहिती जायला हवी. गेली चार वर्षे माझ्यासारखा एक कलाप्रेमी कलावंतांचा चाहता एक प्रयत्न करत आहे, गेली दीड वर्षे नागपूर मधील दैनिक 'बहुजन सौरभ' संपादक, संपादकीय विभाग हे कार्य करत आहे. मी त्यांचेही जाहीर आभार मानतो. आणि कविता विद्यागरताईंनी यापुढेही आपला प्रबोधन चळवळीचा सामाजिक बांधिलकीचा गीत गायनाचा वसा पुढे चालू ठेववा, त्यांना निरोगी दीर्घायुष्य लाभो ही मंगल कामना व्यक्त करतो. ■ ■

## बाप

बाप आहे म्हणून मान आहे
त्याने तुझे व्यक्तिमत्व घडविले आहे
बाबासाहेब रामजी चे शान आहे खूप
शिकून मोठा हो हीच
आण आहे. ...1...

पुस्तकासाठी मुलीचा गहना गहाण
आहे पुस्तकाविना
भीमा राहील कसा पुस्तकात
भिमाचा प्राण आहे ज्ञानपीपास माझा
भिम आहे. ... 2...

भिमाच्या अभ्यासाला
जागवण्यासाठी रात्री
रामजी जागे आहे भीम माझा देशाची
शान आहे उद्याचा दलिताचा तो दाता
आहे. ..3...

बापाला दुर्लक्षित
करू नका हो
तुमच्यासाठी कष्ट झेलले त्याने
तुमच्या उन्नती तर त्याचा प्राण आहे
तुमच्यासाठी दुःख झेलणारा
कोण आहे. ...4...

बापाचं प्रेम तुमच्यासाठी असतं वेड
उंच भरारी घ्या गगनावरती
बापाची करूणा आठवावे
थोडं थोडं
बाप बिना छाया हे ,
आहे कोडं...5...

- इंजि. शुद्धोधन बडवणे

## सावित्रीच्या लेकींनो

सावित्रीच्या लेकींनो जरा करा
आत्मचिंतन
वडाला धागा गुंफून नाही जन्म
जन्माचे मीलन.
हे कसले गणित आहे हे कसले
समीकरण,
सात फेरे वडाला अन्
सात जन्माचे आरक्षण.
सावित्रीची सावली हो,
जरा बुद्धीला दे ताण,
कधी परत येते का
मृत शरीरातील प्राण.
भाकड कथा प्रस्थापितांच्या तुझे
गोवण्या ध्यान.
मूठमाती दे जीर्ण प्रथांना,
ललकार क्रांतीची ताण.
व्रत वैकल्ये करून कोणी दिर्घायुष्यी
होत नाही.
वटपुजूनी सात जन्मी तोच नवरा
मिळत नाही.
वडाला कांहीचे गाऱ्हाणे
परंपरेचा तोडून घेरा,
'हुंड्यासाठी भोगते यातना' सुटे सात
जन्माचा फेरा.
सावित्रीच्या लेकींनो जरा ऐका
उद्याच्या हाका,
वड पिंपळ अंगणी लावा, जळमटे
जाळून टाका.
पर्यावरणाला हात लावा समृध्द करा
वना,
सत्यवानाची सावित्री नाही, क्रांतीची
सावित्री बना.

-चित्तरंजन चौरे



काव्यफुले
संयोजक : प्रा. भीमराव गायकवाड
मो. 9822507225
बहुजन सौरभ

## थांबवा बाजारीकरण

आता असे काय बघताय
होईल राजे बाजारीकरण
विकली जाईल हो शाळा
होईल बघा खाजगीकरण
नाव दिले जाईल शाळेला
काय ते लेखपती करोडपतीचे
बोली लागेल एका क्षणात
होईल लिलाव सरकारी शाळाचे
गरीब पालकांची पाल्ये
होतील शिक्षणापासुन दूर
का बरे ठेवू पाहता वंचित
येईल त्याच्या जीवनी अंधार
नको हे अशैक्षणिक कामे
उतरले शिक्षक रस्त्यावर
आक्रोश मोर्चा चालला
जिल्हाधिकारी कार्यालयावर
शाळा हे मंदिर व विद्यार्थी दैवत
आता तर जागृत व्हा शिक्षकहो
शंभर तर ना ऐंशी टक्के जमत
शैक्षणिक कार्य करा मैत्रिणीनो
सर्व मुलांना दिला संविधानाने
हक्क शिक्षणाचा अधिकार
मिळवून देवू त्याचा अधिकार
इथेच थांबवू हे बाजारीकरण

- कुसुमलता दिलीप वाकडे

## लेकीचे रमाईला गाऱ्हाणे...

रमाई !
तुझे बालवयातच लग्न झाले
आम्हाला आमचे करियर वाढवायचे
आहे
म्हणून अजून लग्न नाही केले...
रमाई !
तू भीमाला न पाहताच पसंत केले
आमचे अनेक स्थळ बघून झाले
तरी पण योग नाही आले
आमचे वय वाढतच गेले
म्हणून मॅरेज ब्युरोला
चांगले दिवस आले...
रमाई !
तू भरल्या घरात संसार सावरला होता
माई
आम्हाला तर नवऱ्याशिवाय
घरात सासू - सासरे सहन होत
नाही...
रमाई !
तू दहा बाय दहाच्या अंधाऱ्या खोलीत
संसारात उजेड पेरला होता,
माई, आमच्या थ्री बी.एच.के.
फ्लॅटच्या
झगमगाटात आपलेपणा हरवला
आहे...
रमाई !
तू चार - चार लेकरे
भूमीला दान केलेस
माई, आम्हाला लग्नानंतर
3/4 वर्ष एन्जॉय करायला पाहिजेत.
म्हणून सध्याच पाळण्याची दोरी
नाही पाहिजे...
रमाई !
तू 45 रुपयात महिन्याचा
घरखर्च भागवायची
आम्हाला तर पगार पुरतच नाही
बजेटचा झाला चुराडा
कर्जाच्या हप्त्याची सोय लागत
नाही...
रमाई !
तू लुगड्याच्या गाठी बांधून
स्वतःची अब्रु झाकली होतीस
आता फॅशनच्या जमान्यात
आम्हाला अंगप्रदर्शन करावे लागते
म्हणून कपड्यांचं ओझ सहन होत
नाही...
रमाई !
तू काड्या-गोवऱ्यासाठी
अंधारात पायपीट केलीस
आम्हाला मेकअप करण्यासाठी
पायपीट करावी लागते
उजेडातल्या प्रतीकेसाठी...
रमाई !
तुझ्या बरोबर सोबत करायला
भीमाजवळ वेळ नव्हता
आणि तुला भीमाकडे तक्रार
करायला वेळ नव्हता.
पण माई आमची समस्या वेगळी आहे
नवरा जवळ असला तरी प्रॉब्लेम
आणि जवळ नसला तरी प्रॉब्लेम...

- माणिकराव खोब्रागडे

## हरदास नगराळे

हरदास नगराळे लक्ष्मणरावांचे पुत
दिली हाळी जयभीम झाली अमर जगात
वृतपत्र महारथ कार्य मजूर पक्षात
ग्रन्थ मंडल महात्म्य रात्र शाळा कामठीत
बौद्ध धर्म जोपासना सारे जीवन वाहिले
धम्म दिक्ष अनुयाया नवि जाण नवे धाम
भेटे कोणी सान मोठा सर्वांमुखी एक नाम
आता सोडा राम राम आणि म्हणा जयभीम
गोलमेज बैठकीत विचार नविन आला
खरा कोण असणार दलितांना तारणार
हरिदासे समयास बहु पत्रव्यवहार
डॉकटर आंबेडकर शिवाय कोण होणार
एआय डिसीएफ चे अध्यक्ष आणि सचिव
नाटक व ग्रन्थ सवे वृत्तपत्रात लेखन
धावपळ दगदग क्षयरोग अंगावर
झाला त्याचा परिणाम मावळले पंचप्राण
दिला नारा जगभर केला भिमाचा जागर
गट दलितांचे सारे जयभीम म्हणणार
नाही पणती जयंती नाही कुणाला असर
होते झाले आहे बहु परी ऐसा न होणार

- बिगुल स्वामी

## मोबाईल

ज्ञानाची गंगोत्री
मोबाईल खात्री
क्षणोक्षणी ज्ञान
मिळे रात्रोरात्री..

मोबाईल फोन
गरजेचाच झाला
क्षणोक्षणी माझ्या
वापरात आला..

जाणावे महत्त्व
ते मोबाईलचे
सुसंवाद साधा
नात्याचे गोत्याचे..

मोबाईल विना
सारे जग बंद
मोबाईलनेच
माणूस बेबंद..

मोबाईल मुळं
जग हे जवळ
ज्ञानाचे भांडार
आहे ते केवळ..

- निर्मला कुलकर्णी

## दंगल घडून येते तेव्हा..?

दंगल घडून येते तेव्हा..?
माणूस माणसाचा वैरी होतो
आपला तुपला समजणारा
दंगलखोर राजकारणाच्या
हातचा बाहूला होतो.
जाळपोळ, मारामारी, लुटालूट
बलात्कार अशा घटनांना उधान येते..
निरपराध माणसाचे जीवन उद्धवस्त होते..
शिकणाऱ्या मुलांचे भविष्य
अंधकारमय होते..
दंगल घडून येते तेव्हा..?
राजकारणाचा फायदा होतो
धर्म, जाती, भाषा यांचे मिलन होते..
रंगावरून माणसाचे मोजमापन होते..
पोलिसांना कोंबीन ऑपरेशनचा
परवाना मिळतो..
शांत करण्याच्या जबाबदारी
असतांना
पुन्हा अशांती माजवण्याचे षड्यंत्र
केले जातात..
भारतीयत्व गळून पडते
प्रशासनाला कायद्यापेक्षा



## योगी, भोगी, मोगी, ढोंगी, रोगी यांची चलती येते..

धर्म जातीची नशा चढते..
चितावणीखोर भाषेची चंगळ असते..
आया, बहिण, भावांना जेलमध्ये
भरल्या जाते..
खोटे गुन्हे लावून
अमानवीय अत्याचार केले जाते..
ब्रिटिशांपेक्षाही कुर अशी वागणूक
दिली जाते..
अहंकाराचा सारा राग निरपराधावर
काढला जातो..
माणसाच्या माणुसकीचा गळा घोटला
जातो..
दंगल घडून येते तेव्हा ?
दंगल घडून येते तेव्हा ?
शहर निरपेक्ष शून्य होते..
भयभीत रस्ते आर्त
टाहो फोडतात..
सायरनच्या आवाजाने माणसे
दहशतीत असतात..
दंगल अशी माणसांच्या जीवावर
उठलेली असते..
दंगल मास्टरमाईन नवनव्या युक्त्या
शोधतो..
धर्म व जातीची नशा पाजून पुन्हा
दंगल भडकवतो..
दंगलीत पुन्हा तेच प्रकार घडतात..
अशी दंगल भारतीयांना हवी का ?
म्हणून दंगल होऊच नये
यासाठी सर्व बांधवांनी एक व्हावं..
राजकारणी लोकांच्या
भुलतापांना बळी न पडता
भारतीयत्व जपावं
दंगल घडूच नये
यासाठी काम करावे ..
नाहीतर
दंगल घडून येते तेव्हा ?
पुन्हा पुन्हा जखमा
ताज्या ताज्या होतील
आणि
पुन्हा पुन्हा माणसे
तुटले जातील
कापले जातील....

- संदीप गायकवाड

## खरं सांग देवा....

खरं सांग देवा आता,
जेवला का पोटभर...?
पंचपक्वानातुन थोडं
घेऊ का रे बोटभर
आई उठली सकाळी,
तशी रांधुच राहिली,
म्हणे, देवाला निव्वद,
खीर नाही चाखली
पसारा केला घरभर...
खरं सांग देवा आता,
जेवला का पोटभर..?
भाऊ रडतो उपाशी,
त्याकडे लक्ष देईना,
रडतो मग, रडू दे,
तुझा धावा काही सोडेना
भीरती तीची नजर
खरं सांग देवा आता,
जेवला का पोटभर...?
तुला देते रे ती दही ....
आम्हाला नसु दे काही,
दुधाने तुला अंघोळ,
संगे पंचामृत राही
नाही उरत कणभर...
खरं सांग देवा आता..
जेवला का पोटभर...?
तुझा भरला गाभारा,
तुझा घास सोन्याचा,
तुझ्या चरणावरती,
वाहे पूर भक्तीचा
सारे करता कसे
मरमर....
खरं सांग देवा आता,
जेवला का पोटभर...?
दगडाच्या देवा तुला,
शेंदूर असा फासीला,
चार चौघात तुझा,
रुबाब कसा वाढला
कसं तेज मुखावर...
खरं सांग देवा आता,
जेवला का पोटभर...?
पुरे झाले तुझे गाणे,
नको जूणे तुणतुणे,
तु दगडात लपलास,
कुठे आहे तुझे रहाणे
हरवलास कुठवर... ?
खरं सांग देवा आता...
जेवला का पोटभर...?
उचलु का रे देवा,
नैवेद्याचं पुरं ताट,
वाट पाहुन, पाहून,
भुकेची लागली वाट,
तुझं भरलं असेल तर.....
खरं सांग देवा आता,
जेवला का पोटभर...?
पंचपक्वानातुन थोडं,
घेऊ का रे बोटभर....?

- विक्रम गांगुर्डे

## वसुंधरे ! तुझी व्यथा...

वसुंधरे !
तुझ्या उत्पत्तीपासून, जोपासलेस,
पाळलेस आम्हा आजपर्यंत,
नी, तु, जोपासणार पाळणार,
आम्हास येणाऱ्या भविष्यात,
किती हे तुझे ऋण
आम्हा मानव जातीवर,
निसर्गावर, पर्यावरणावर -
प्राणीमात्रावर !
मात्र,
वसुंधरे !
आम्ही तुझी बईमान लेकरे,
विसरत चाललोय तुझे ऋण,
नष्ट करित आहोत,
तुझी नैसर्गिक संपत्ती,
तुझ्या अस्तीत्वाला धोका
निर्माण करित आहोत,
स्वतःच्या स्वार्थासाठी,
वसुंधरे !
तु निराश होउ नकोस -
तु तुझ्या कुशीतच -
जन्म दिलास तथागथाला -
सिध्दार्थ गौतमाला
अडीच हजार वर्षापुर्वी,
भारत देशात.
त्याने ते दिले तत्व पंचशिलेचे,
मानव हिताचे
त्यांचीच विचार सरणी,
संपुर्ण विश्व स्विकारित आहेत,
वसुंधरे !
मी खात्रीने सांगतो,
तु निराश होउ नकोस,
तु जशी होतीस,
अगदी त्यापेक्षा चांगली होशील,
ह्याची ग्वाही देतो
तथागथाच्या बुध्द धम्माचाच मार्ग
याला पर्याय आहे.

- ॲड. सुधाकर आटे

## महत्वाचे

### शिवराज्याभिषेक दिनानिमित्त अभिवादन




**नांदेड :** हिंदवी स्वराज्य संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांचा राज्याभिषेक सोहळा किल्ले रायगडावर 6जून 1674 रोजी संपन्न झाला होता. त्यानुषंगाने आज शिवराज्याभिषेक दिनानिमित्त शहर व जिल्हा काँग्रेस कमिटी नवामोंढा कार्यालयात छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन करुन पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी ज्येष्ठ काँग्रेस पदाधिकारी प्रफुल्ल सावंत, सुरेंद्र घोडजकर, उद्धवराव लांडगे, विठ्ठल पावडे, डॉ. करुणा जमदाडे, किशनराव रावणगांवकर, नागराज सुलगेकर, हंसराज काटकांबळे, गौतम शिरसाठ, व्यंकटराव नरवाडे, रामचंद्र देठे आदींनी अभिवादन केले. खासदार प्रा. रविंद्र पाटील चव्हाण, दक्षिण जिल्हाध्यक्ष हानुमंतराव पाटील बेटमोगरेकर महानगराध्यक्ष अब्दुल सत्तार यांनी यावेळी अभिवादन कार्यक्रमास शुभेच्छा संदेश पाठवला.

### महाराष्ट्र नाट्य परिषदद्वारा आयोजित शिबिराचे उद्घाटन



**नागपूर :** महाराष्ट्र नाट्य परिषद नागपूरद्वारा बालनाट्य अभिनय आणि नृत्य तसेच व्यक्ती महत्व विकास शिबीराचे गुरुदेव सेवा मंडळ, आगाराम देवी चौक येथे उद्घाटन झाले. शिबिराचे उद्घाटन अशोक ठाकरे यांच्या हस्ते करण्यात आले, या सोहळ्याला राजेश कुंभलकर, कैलाश तानकर, तसेच नगर सेवीका हर्षला साबळे आणि महाराष्ट्र नाट्य परिषदेचे अध्यक्ष राजेंद्र टेकाडे यांच्या प्रमुख उपस्थितीत हा सोहळा संपन्न झाला. शिबीराचे प्रशिक्षक तथा आयोजिका प्रा. डॉ. संगीता टेकाडे आणि अदिती (निर्मिती) टेकाडे यांनी शिबीराचे आयोजन केले. दि.5 ते 20 जून पर्यंत हे शिबीर आयोजित करण्यात आले असुन 4 वर्षापासून तर 15 वर्ष वयातील मुल यात सहभागी आहेत. या शिबिराला यशस्वी करण्याकरिता नताशा ओगानिया, रोशणी ओगानिया, कोमल ओगानिया, मयूर तागडे, भुमिका मसराम, अक्षय चवडे, राजू दैवतकर यांनी परिश्रम घेतले.

### कचरा वेचणाऱ्यांच्या मुलांनी घेतली व्यसनमुक्तीची शपथ



**नागपूर :** जयताळा बाजार रोड, झोपडपट्टी भागामधील भंगार, प्लास्टिक कचरा वेचणाऱ्यांच्या मुलांनी व्यसनमुक्तीची शपथ घेत व्यसनी आई-वडिलांना व्यसन सोडण्याचे आव्हान उभे केले. आशीर्वाद फाउंडेशन व उत्कर्ष बहुउद्देशीय संस्था, बोखारा यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित उन्हाळी संस्कार शिबिर अंतर्गत नशाबंदी मंडळाचे जिल्हा संघटक तथा महा. अंनिस चे जिल्हा कार्याध्यक्ष गौरव आळणे यांनी शिबिरार्थी विद्यार्थ्यांना व्यसनांची लक्षणे, प्रकार व दुष्परिणाम पोस्टरद्वारे सचित्र समजावून सांगितले. विद्यार्थ्यांनी उत्तम प्रतिसाद दिला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विलास शेवाळे यांनी उपस्थितांनी आपापल्या पाल्यांना व्यसनमुक्त घडवून नशा मुक्त भारत अभियानाला बळकट करावे असे सांगितले. कार्यक्रमाच्या अंतिम टप्प्यामध्ये कचरा वेचणाऱ्यांच्या शाळकरी मुलांनी व्यसनमुक्तीची सामूहिक शपथ घेतली.

### संयुक्त रिप. आघाडीची आज महत्वाची बैठक

**नागपूर :** आंबेडकरी चळवळीवर असीम प्रेम करणारे कार्यकर्ते, सध्या चळवळीची दशा बघता पुन्हा नव्याने चळवळीला नव दिशा कशी देता येईल व संघटन बळकटीसाठी काय योगदान देता येईल त्याबद्दल चर्चा करण्यासाठी बैठकीचे आयोजन दि. 8 जून 2025 ला 4.30 वा गोंडवाना विकास मंडळ सभागृह तुकडोजी पुतळ्याजवळ, नागपूर येथे आयोजित केली गेले आहे, असे शेषराव गणवीर यांनी सांगितले आहे.

# जाफरनगर ईदगाह मैदानावर ईदच्या नमाजासाठी जमली गर्दी

**नागपूर :** (हे पैगंबर) तुम्ही सांगा, माझी नमाज आणि माझी कुर्बानी आणि माझे जीवन आणि मरण फक्त सर्व जगांचा पालनहार असलेल्या अल्लाहकरीता आहे. आज आपल्याला अशी प्रतिज्ञा करायची आहे की इतरांमध्ये दोष शोधण्याऐवजी आपण स्वतःचे दोष दूर करू. आपल्या आत भरलेल्या ढोंगीपणा आणि ढोंगीपणाचा आपण त्याग करू. आपल्या आत भरलेल्या सर्व मत्सर, द्वेष, क्रोध आणि शत्रुत्वाचा आपण त्याग करू. असे मत जमाअत ए इस्लामी हिंद नागपूर शहर कमिटीचे सदस्य व मरकजे इस्लामी मशिदीचे इमाम मौलाना शाकिरुल अकरम फलाही यांनी ईद उल अजहा निमित्त जाफर नगर येथील 'इदगाह मैदान' येथे पवित्र कुराणच्या सुरा ओळ क्र. अनअमचा 162. ज्याप्रमाणे आपण कुर्बानीसाठी निष्कलंक, निर्दोष प्राणी शोधतो, जेणेकरून आपल्याला तो अल्लाहसमोर सादर करावा लागेल, त्याचप्रमाणे आपण हे देखील लक्षात ठेवले पाहिजे की आपण अल्लाहसमोर स्वतःला सादर करणार आहोत, आपण आपल्या दोषांची देखील काळजी घेतली पाहिजे आणि आपण निष्कलंक बनले पाहिजे. जेणेकरून आपण अल्लाहसमोर आदर, सन्मान आणि यश मिळवू शकू. अल्लाहने हजरत इब्राहिम अलैही वसल्लम यांच्याकडून हजरत इस्माइल अलैही वसल्लम मागितले होते. त्याने आपला मुलगा अल्लाहच्या स्वाधीन केला होता. कुर्बानी म्हणजे प्रत्यक्षात शरणागतीचे नाव आहे. द्वेष आणि हेरगिरीऐवजी त्यांनी प्रेम आणि बंधुत्वाचा संदेश पसरवणे आणि धार्मिकतेचे जीवन जगणे आणि अल्लाहचे धार्मिक सेवक बनण्यावर भर दिला. त्यानंतर, जाफर नगरच्या जामा मशिदीचे इमाम कारी हाफिज रहमतुल्लाह साहिब यांनी प्रवचन दिले आणि नमाज पठण केल्यानंतर लोकांच्या शांती आणि आरोग्यासाठी प्रार्थना केली. ईदगाह मैदानाबद्दल माहिती देताना इम्रान अली म्हणाले की, ईदची पहिली नमाज 1989 मध्ये 'तन्झीम मुस्लिम नौजवाने जाफर नगर'द्वारे अदा करण्यात आली होती. ईदच्या नमाज व्यतिरिक्त, सामाजिक-राजकीय आणि सार्वजनिक सेवा कामे देखील येथे केली जातात. गेल्या वर्षी दीड लाख रुपयांचे दान करण्यात आले होते. आजच्या नमाजसाठी सुमारे 30 ते 35 हजार रुपये खर्च येईल. सीसीटीव्ही, जय नमाज खरेदी करण्याची तरतूद आहे. हे जाफर मोईनुद्दीन पटेल सा. यांचे वक्फ स्थान आहे. दरवर्षीप्रमाणे, यावेळीही 'जाफर नगर ईदगाह मैदान' येथे ईदच्या नमाजासाठी मोठी गर्दी जमली होती. आवश्यक पोलीस दल तैनात केल्याबद्दल आम्ही गिट्टीखाना पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक कैलाश चंद्रकांत देशमाने यांचे आभार मानले. ईदगाह मैदानावर सर्वांनी एकमेकांना मिठी मारली आणि एकमेकांना ईदच्या शुभेच्छा दिल्या. ही माहिती जमाअत ए इस्लामी हिंद नागपूरचे मीडिया सचिव डॉ. एम. ए. रशीद यांनी दिली.






रमाईचे स्वप्न - १०७

**भीमोदय मंडळ बौद्ध विहार विश्वकर्मानगर नागपूर.**

या विहारात दररोज सायंकाळी सात ते नऊ वाजता बुद्ध वंदना होते. याच विहारात डॉ. बाबासाहेब आंबेडकर अध्ययन कक्षामध्ये विद्यार्थी अभ्यास करतात. तसेच सर्व महापुरुषांच्या जयंतीचे प्रबोधनपर कार्यक्रम आयोजित केले जातात. तसेच `बुद्ध आणि त्याचा धम्म'वर प्रबोधन. तसेच मिलींद प्रश्न, संविधान वाचन होते. व्याख्यानमाला, बाल संस्कार शिबिर, धम्म संस्कार याचे आयोजन केले जाते. वर्षावास समाप्ती कार्यक्रम मोठ्या प्रमाणात होतो. बुद्ध पौर्णिमेच्या दिवशी विविध कार्यक्रम आयोजित करण्यात येतात.

संवाद मित्र, धनविजय बौद्ध

## पियुष गजभिये ठरेल एडुनेक्स्ट इंटरनॅशनल कॉलेज मधील पहिला आयआयटीयन!



**नागपूर :** मांढळ येथील एड्युनेक्स्ट इंटरनॅशनल स्कूल अँड ज्युनियर कॉलेज मधील विद्यार्थी पियुष गजभिये याने IIT JEE च्या परीक्षेमध्ये मध्ये मेन्स मध्ये 93टक्के आणि अॅडव्हान्समध्ये sc rank 1687 घेऊन नवीन अध्याय लिहिला.

पियुषच्या प्रवास खरेच फार कठीण होता. एका गरीब गजभिये कुटुंबात त्याचा जन्म झाला, त्यात पियुषच्या वडिलांचा गुन्हेगार प्रवृत्तीची संबंध असल्यामुळे आई-मुलांना सारखा त्रास व्हायचा. जेव्हा पियुष पाच वर्षाचा होता त्यावेळेस त्याच्या वडिलांची हत्या करण्यात आली, समोरचे आयुष्य कठीण असताना त्याच्या आईने दुसरे लग्न केले. पण पियुषचा संघर्ष सुरूच राहिला. परिस्थिती सोबत त्यात दहावीत असताना त्याला 90टक्के गुण मिळाले. पण कोणीच त्याचे फारसे कौतुक केले नाही व अकरावी बारावी सायन्स घ्यायचे स्वप्न होते पण आई-वडील ITI कर असे म्हणाले व पियुषला ते करायचे नसल्यामुळे तो मामाकडे म्हणजेच गौतम गणवीर यांच्याकडे वडेगाव मांडळ येथे आला व इथे एड्युनेक्स्ट इंटरनॅशनल स्कूल जुनियर कॉलेजमध्ये प्रवेश केला. येथील प्रथम बॅचमधील मुले पुण्यातील नामांकित कॉलेजमध्ये गेलेले त्यांनी बघितले व आपण आणखी चांगल्या कॉलेजमध्ये जाऊ म्हणून त्याने बारावीसोबत आयआयटी एंट्रन्स अभ्यास सुरू केला व त्यात त्याने बारावी बोर्डला 87टक्के घेऊन कॉलेजमधून दुसरा क्रमांक पटकावला व आयआयटी अॅडव्हान्स मध्ये एस सी रँक 5438 मिळवला. पण त्याला माहिती होते की या रँक वर चांगले कॉलेज नाही मिळणार याची गॅरंटी नव्हती. म्हणून त्याने पुन्हा जोमाने अभ्यास सुरू केला व योग्य मार्गदर्शन व कठोर मेहनतीच्या जोरावर कोणते पण क्लास न लावता त्याने 2025 मधील IIT एट्रन्समध्ये मेन्स मध्ये 93टक्के व अॅडव्हान्स मध्ये 1687 रँक मिळवली. पियुष्य ला नक्कीच चांगले IIT कॉलेज मिळेल व त्याचे आयुष्य उज्वल होईल यात काही शंका नाही.

एड्युनेक्स्ट इंटरनॅशनल स्कूल व शांती फाउंडेशन कडून स्वर्गीय डॉ. शेखर धनविजय यांच्या स्मृतिप्रित्यर्थ स्कॉलरशिप जाहीर करण्यात आली आहे. त्यात गरीब होतकरू विद्यार्थ्यांकरिता आर्थिक मदत करण्यात येत आहे. जेणेकरून ग्रामीण भागातील गरीब हुशार विद्यार्थ्यांचे शिक्षण पूर्ण होऊ शकेल. परत पियुषच्या जिद्दीला एडुनेक्स्ट इंटरनॅशनल स्कूल अँड ज्युनियर कॉलेज आणि टीमकडून सलाम आणि उज्वल भविष्याकरता हार्दिक शुभेच्छा!

## हरिभाऊ नाईक स्मृती समाजसेवा प्रतिष्ठानचा तिसरा स्मृतिदिन रविवारी

**नागपूर :** स्मृतीशेष हरिभाऊजी नाईक कामगार नेते माजी महापौर नागपूर व माजी मंत्री यांचे तृतीय स्मृतिदिनानिमित्ताने रविवार दि. 8 जून रोजी शिक्षक सहकारी बँक सभागृह गांधी सागर जवळ स्मृतिदिना चा कार्यक्रम आयोजित केला आहे.

कार्यक्रमाचे अध्यक्ष नितीन गडकरी रस्ते वाहतूक मंत्री हे राहतील. तसेच विशेष अतिथी पाहुणे माजी खासदार दत्ता मेघे आणि खासदार श्यामकुमार बर्वे तसेच प्रमुख पाहुणे आमदार सचिन अहिर, आमदार विकास ठाकरे, आमदार अभिजीत वंजारी, कामगार नेते एस. क्यू. जामा यांची प्रामुख्याने उपस्थिती राहील. कार्यक्रमाला आर्थिकदृष्ट्या गरजू विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप करण्यात येणार आहे आणि इयत्ता 10 वी व 12 वीचे 2024 व 25 चे वार्षिक परीक्षा गुणवत्तेसह जे विद्यार्थी उत्तीर्ण झालेले आहेत. अशांना शिष्यवृत्तीचे वाटप करण्याचे प्रयोजन केले आहे. वरील कार्यक्रम रविवार 8 जून रोजी सकाळी 10:30 वाजता सुरू होणार आहे. विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र व मेडल देऊन सत्कार करण्यात येईल. कार्यक्रमाचे आयोजन हरिभाऊ नाईक स्मृती समाजसेवा प्रतिष्ठानच्या वतीने करण्यात आलेले आहे.

या कार्यक्रमात जास्तीत जास्त मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन आयोजकांनी केले आहे.

## जागतिक पर्यावरण दिनानिमित्त वृक्षारोपण

**नागपूर :** ज्ञानप्रकाश बहुउद्देशिय शिक्षण व सामाजिक संख्या नागपूर, या संस्थेने जागतिक पर्यावरण दिनाचे औचित्य साधून चिकणा, गट ग्रामपंचायत, व आऊटर रिंग रोड मध्ये मोठ्या प्रमाणात वृक्षारोपण केले. दरवर्षी 5 जून ला जागतिक पर्यावरण दिन मोठ्या प्रमाणात साजरा केला जातो. त्याचे मुख्य उद्देश म्हणजे पर्यावरणाबद्दल जागरूकता वाढविणे. प्रदुषण कमी करणे. पर्यावरणाचे समतोल राखणे. जास्तीत जास्त प्रमाणात 'वृक्षारोपण करण्यात यावे व आजच्या तरुण पिढीने पुढाकार घेऊन पर्यावरणा बद्दल समाजात जागरुकता निर्माण करणे असे मत संस्थेचे अध्यक्षा रेश्मा सिद्धार्थ सहारे यांनी व्यक्त केले. कार्यक्रमाला, समाजसेविका वंदना ताकसांडे, शिल्पा मकेश्वर, सुखदेव पळसपगारे, गरीबदास गजभीये, राजेश माटे आदी उपस्थित होते.




## शेतकऱ्यांच्या खात्यात बोनसची रक्कम होणार जमा - खासदार प्रफुल पटेल

**गोंदिया :** शेतकऱ्यांच्या मदतीसाठी सदैव कार्यतत्पर राहून शेतकरी वर्गाच्या हिताचे काम खासदार प्रफुल पटेल यांनी नेहमीच केले आहे. आज खासदार प्रफुल पटेल यांनी राज्याचे वित्तमंत्री व उपमुख्यमंत्री ना. अजितदादा पवार यांच्याशी प्रलंबित धान बोनस संदर्भात सविस्तर चर्चा केली. या चर्चेचे फलस्वरूप सरकारने बोनसचे पैसे वितरीत करण्याचा निर्णय घेतला असून आजच शासनाच्या वतीने 900 कोटी रुपयांचा निधी जिल्हा मार्केटिंग फेडरेशन संस्थेला उपलब्ध होणार आहे. उर्वरित रक्कम आगामी 10 दिवसात देण्याचे आश्वासन राज्याचे वित्त मंत्री व उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिले आहे. तसेच लवकरात लवकर धान उत्पादक शेतकऱ्यांच्या बँक खात्यांमध्ये बोनसची रक्कम जमा करण्याच्या सूचना संबंधित अधिकाऱ्यांना दिल्या आहेत.



शासकीय आधारभूत खरेदी केंद्रावर विक्री केलेल्या शेतकऱ्यांना बोनस देण्याची घोषणा महायुतीच्या सरकारने केली होती. शेतकऱ्यांना लवकरात लवकर धान बोनसचे पैसे मिळावे यासाठी खासदार प्रफुल पटेल यांनी राज्याचे मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्र्यांसह संबंधित अधिकाऱ्यांशी सातत्याने संपर्क साधत हा प्रश्न मार्गी लावण्यासाठी सातत्याने प्रयत्न केले. त्यांच्या या प्रयत्नामुळे हजारो शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळणार आहे.

## स्पर्धा परीक्षेची तयारी शालेय जीवनापासूनच करा! विकास खारगे



**अमरावती :** शालेय जीवनापासून स्पर्धा परीक्षेची तयारी केली तर स्पर्धा परीक्षेमध्ये लवकर यशस्वी होता येते. त्यामुळे पालकांनी व विद्यार्थ्यांनी याकडे लक्ष देऊन शालेय जीवनापासूनच स्पर्धा परीक्षेची तयारी करण्यास प्रारंभ करावा. ही तयारी केल्यामुळे मुलांचे व्यक्तिमत्व चांगले विकसित होते व तो ज्या क्षेत्रात जाईल त्या क्षेत्रामध्ये भरारी घेऊ शकतो असे प्रतिपादन यावर्षी आय ए एस झालेल्या विद्यार्थ्यांनी अमरावती येथे राज्यस्तरीय स्पर्धा परीक्षा कार्यशाळेत बोलताना काढले. शिवराज्याभिषेक दिनानिमित्त आयोजित करण्यात आलेल्या स्पर्धा परीक्षा कार्यशाळा व आयएएस विद्यार्थ्यांचा सत्कार या कार्यक्रमात ते बोलत होते.

अमरावतीच्या सुप्रसिद्ध अशा डॉ. पंजाबराव देशमुख आयएएस अकादमीच्या मिशन आयएएस युवा संवाद प्रतिष्ठान व पुणे येथील स्व. रवीन्द्र जाधव ग्लोबल फाउंडेशनच्या वतीने या कार्यक्रमाचे आयोजन अमरावतीच्या अभियंता भवन येथे करण्यात आले होते. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी सुप्रसिद्ध समाजसेविका माजी लेडी गव्हर्नर व सर्वोच्च न्यायालयाचे सरन्यायाधीश भूषण गवई यांच्या मातोश्री कमल गवई या उपस्थित होत्या. या कार्यक्रमात सर्वश्री रजत पत्रे डॉ. जयकुमार आडे, नम्रता ठाकरे, अश्विनी धामणकर, मोहिनी खंडारे यांचा स्मृतिचिन्ह शाल व ग्रंथ देऊन सत्कार करण्यात आला. तसेच बँक ऑफ महाराष्ट्र विभागीय कार्यालय अमरावती यांच्यावतीने महेश डांगे यांनी सर्व आयोजित झालेल्या विद्यार्थ्यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले तर मोझरीच्या अखिल भारतीय श्री गुरुदेव सेवा मंडळतर्फे प्रत्येक कलेक्टर झालेल्या विद्यार्थ्यांना ग्रामगीता देऊन अखिल भारतीय श्री गुरुदेव सेवा मंडळचे सचिव जनार्दनपंत बोथे यांच्या वतीने सन्मान करण्यात आला. त्याचबरोबर महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे आपण मुख्य सचिव विकास खारगे व अमरावती महानगरपालिका आयुक्त सचिन कलंत्रे यांनी सर्व विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या. तसेच डागा सफायरचे राजेश डागा यांच्यावतीने देखील स्मृतिचिन्ह व ड्राय बुके देऊन सत्कार करण्यात आला. तसेच जिजाऊ कमर्शियल बँकेचे अध्यक्ष अविनाश कोठाळे, उपाध्यक्ष चौधरी व त्यांच्या चमुने उपस्थित सर्व विद्यार्थ्यांचा पुस्तके देऊन सत्कार केला. कार्यक्रमाचे संचालन प्रा. डॉ. नरेशचंद्र काठोळे यांनी केला.

जाहिरात



प्रॉपर्टी घेणे विकणे भाड्याने देणे अधिक माहिती करिता

संपर्क ९३२५६२९६३५

# युपीएससी वनसेवा परीक्षेत 'महाज्योती'च्या विद्यार्थ्यांचा डंका






**नागपूर :** राज्य सरकारच्या इतर मागास बहुजन कल्याण विभागाअंतर्गत कार्यरत महात्मा ज्योतिबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्था (महाज्योती) यांचा गुणवत्तापूर्ण प्रशिक्षण आणि आर्थिक सहाय्य कार्यक्रम फलद्रूप ठरला असून, केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या (युपीएससी) वन सेवा 2024 च्या अंतिम यादीत या संस्थेच्या प्रशिक्षणार्थी 4 विद्यार्थ्यांची निवड झाली आहे. ओबीसी व भटक्या जमाती प्रवर्गातील या विद्यार्थ्यांनी आपले स्वप्न प्रत्यक्षात उतरवत यशाची उत्तुंग भरारी घेतली आहे. महाज्योती संस्थेच्या रामेत महादेवराव ढगे (रँक 54), दीपक रमेश विश्वकर्मा (रँक 71), वीर ऋषिकेश नागनाथ (रँक 83) आणि भटक्या जमाती प्रवर्गातील हरी दगडू पालवे (रँक 99) या चार विद्यार्थ्यांचा समावेश आहे. या चारही विद्यार्थ्यांनी ग्रामीण पार्श्वभूमीतून येत असूनही कठोर परिश्रम, योग्य मार्गदर्शन आणि महाज्योतीच्या पाठबळामुळे स्पर्धा परीक्षेत आपला ठसा उमटवला आहे. अशी माहिती महाज्योतीचे प्र. व्यवस्थापकीय संचालक प्रशांत वावगे यांनी प्रसिद्धी पत्रकातून दिली.

या यशाबद्दल प्रशांत वावगे यांनी माहिती देताना सांगितले, 'महाज्योती' राज्यातील इतर मागास वर्ग (ओबीसी), विमुक्त जाती-भटक्या जमाती (व्हीजेएनटी) आणि विशेष मागास प्रवर्गातील (एसबीसी) विद्यार्थ्यांना दर्जेदार प्रशिक्षण देण्यासाठी प्रसिद्ध आहे. संस्थेच्या गुणवत्तापूर्ण मार्गदर्शनामुळे व आर्थिक सहाय्यामुळे हे यश शक्य झाले. चारही विद्यार्थ्यांना मुख्य परीक्षेसाठी 50 हजार रुपये आणि मुलाखतीसाठी 25 हजार रुपये इतके अर्थसहाय्य देण्यात आले. ही यशोगाथा इतर विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी ठरेल. विद्यार्थ्यांनी अत्यंत कठोर परिश्रम करत, संस्थेच्या सहकार्याने अभ्यासक्रम पूर्ण केला. महाज्योतीने चाचणी परीक्षा, अभ्यास साहित्य, ऑनलाईन लेक्चर्स, वैयक्तिक मार्गदर्शन अशा विविध माध्यमातून विद्यार्थ्यांना युपीएससी परीक्षेसाठी सुसज्ज केले. प्रेरणादायी बाब म्हणजे हे विद्यार्थी कोणतेही खासगी क्लासेस न लावता फक्त महाज्योतीच्या साधनांचा वापर करून उत्तीर्ण झाले आहेत असेही प्रशांत वावगे म्हणाले.

'शिक्षण हेच भविष्य घडवण्याचे साधन आहे,' या तत्वावर आधारित कार्य करणारी महाज्योती संस्था केवळ प्रशिक्षणपुरती मर्यादित न राहता, विद्यार्थ्यांना शासन सेवेत संधी मिळावी यासाठी सातत्याने कार्यरत आहे, असल्याचे प्रशांत वावगे म्हणाले. या यशामुळे ओबीसी व भटक्या जातीतील विद्यार्थ्यांच्या आत्मविश्वासात भर घातली असून, सामाजिक समावेश, प्रतिनिधित्व आणि न्याय या क्षेत्रांमध्ये महाज्योतीचा महत्त्वपूर्ण वाटा अधोरेखित झाला आहे. या विद्यार्थ्यांचे यश हे केवळ वैयक्तिक नाही, तर सामाजिक प्रगतीचे लक्षण आहे. महाज्योतीचा हा 'प्रशिक्षण ते प्रशासन' प्रवास आज अनेकांच्या स्वप्नांना पंख देत असल्याचे मनोगत यशस्वी विद्यार्थ्यांच्या पालकांनी केले आहे.

**स्पर्धा परीक्षांतील हे यश महाज्योतीच्या प्रयत्नांची फळं : मंत्री अतुल सावे**

केंद्रीय लोकसेवा आयोग (युपीएससी) वन सेवा 2024 परीक्षेत महाज्योतीमार्फत मार्गदर्शन घेतलेल्या चार विद्यार्थ्यांनी मिळवलेल्या उल्लेखनीय यशाबद्दल इतर मागास बहुजन कल्याण विभागाचे मंत्री तथा महाज्योतीचे अध्यक्ष ना. अतुल सावे यांनी आनंद व्यक्त केला आहे. त्यांनी म्हटले की, महाज्योतीमार्फत दिले जाणारे दर्जेदार प्रशिक्षण आणि शैक्षणिक पाठबळ यामुळेच विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षांमध्ये घवघवीत यश मिळत आहे. या यशामुळे संस्था अधिक बळकट झाली असून, विद्यार्थ्यांसाठी ही प्रेरणादायी कामगिरी ठरणार आहे.

मंत्री सावे यांनी महाज्योतीच्या कार्यपद्धतीचे कौतुक करताना नमूद केले की, महाज्योती ही केवळ प्रशिक्षण संस्था न राहता, विद्यार्थ्यांना शासन सेवेत संधी मिळावी यासाठी सातत्याने कार्यरत आहे. युपीएससी परीक्षेत यशस्वी ठरलेल्या विद्यार्थ्यांचे मनःपूर्वक अभिनंदन करत असून, त्यांच्या पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा देतो. ते पुढे म्हणाले की, संपूर्ण महाराष्ट्रभर महाज्योतीने मागासवर्गीय विद्यार्थ्यांसाठी उभे केलेले प्रशिक्षण नेटवर्क आणि आर्थिक मदतीच्या योजना हे या यशामागील प्रमुख आधार आहेत. शिक्षण आणि संधी यांच्या माध्यमातून समाजाच्या सर्व थरातील युवकांना मुख्य प्रवाहात आणण्याचे महाज्योतीचे योगदान उल्लेखनीय आहे. मंत्री सावे यांनी भविष्यात आणखी अधिक विद्यार्थ्यांनी अशा राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धा परीक्षांमध्ये यश मिळवावे यासाठी सर्वतोपरी प्रयत्न सुरू राहतील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

स्टुडिओ किरायाने देणे आहे



दैनिक बहुजन सौरभने एक उत्कृष्ट दर्जाचा स्टुडिओ तयार केलेला आहे. बेरोजगार विद्यार्थ्यांसाठी एक आठवड्याचा मोफत कोर्स करण्याचा मानस आहे. ज्या कोणाला नाटक, गाणी, कराओके किंवा फेसबुक रिलवर टाकणारी कोणतीही माहितीसाठी स्टुडिओचा वापर करायचा असल्यास तासाप्रमाणे भाड्याने देणे आहे. अधिक माहितीसाठी संपर्क साधावा.



मो. 8482839451

बहुजन सौरभ प्रकाशक, संपादक, मालक, मुद्रक सिध्दार्थ जीवन कांबळे यांनी देश प्रेस पब्लिकेशन, E-30/2, इंडस्ट्रीयल एरिया, सोनेगाव (सीम), हिंगणा, एम.आय.डी.सी., नागपूर - 440016 येथे मुद्रित केले व 9/2, स्वराज कॉलनी, मेडिकल कॉलेजच्या मागे, नागपूर-440027, येथे प्रकाशित केले. **RNI No. MAHMAR 2020/84035** Printed, Owner by Siddharth Jiwan Kamble, Publisched at 9/2 Swaraj Colony, Behind Medical College, Nagpur 440027, Printed at M/S Desh Publication, E-30/2, Industrial Area, Sonegaon (SEEM), Hingna, MIDC, Nagpur-440016, Editor Siddharth Jiwan Kamble Email: bahujansaurabh@gmail.com Mobile: 9422860648